सीएनआर नं.– एमएचएलसी ३६०००००७५२०१९

## रमेश बोम्बार्डे –विरुध्द– मेसर्स ऐलोरा पेपर मिल व इतर

## निशाणी क्र. सी.–१६ वरील आदेश

गैरअर्जदार क्र. १ नी प्रस्तुतचा अर्ज हा निशाणी क्र. यु.–१ वर उत्तर नाही असा आदेश रद्द करुन उत्तर दाखल करण्याची परवानगी मिळण्याकरिता दिला आहे.

२. सदरील अर्जावर विरुध्द पक्षकाराचे म्हणणे मागवण्यात आले. अर्जदारातर्फे म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. दोन्ही विद्यीज्ञांचा प्रदिर्घ युक्तिवाद ऐकला. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसते की, अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा गैरअर्जदाराविरुध्द कर्मचारी नुकसान भरपाई कायदा, १९२३ च्या कलम २२ प्रमाणे नुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. गैरअर्जदार क्र. १ हे हजर होवुनही त्यांनी मुदतीत उत्तर दाखल केले नसल्यामुळे दिनांक १५.०२.२०२० रोजी त्यांचे उत्तर नाही असा आदेश पारित करण्यात आला. त्यानंतर गैरअर्जदारातर्फे प्रस्तुतचा अर्ज देण्यात आला.

४. अर्जाचे स्वरुप पाहता योग्य न्यायदानाच्या दृष्टीकोनातुन विरुध्द पक्षकाराला त्याची बाजु मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. असे असले तरी झालेला विलंब दुर्लक्षित करुन चालणार नाही म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

LABOUR COURT

## आ दे श

१. अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ नी अर्जाचा खर्च म्हणुन अर्जदार याला रक्कम रुपये २००/– (रुपये दोनशे फक्त) दयावेत.

भंडारा.
दिनांक : ०१/०८/२०२४.

(एफ.के. शेख)
न्यायाधिश,
कामगार न्यायालय, भंडारा.

LABOUR COURT